वन विभागातील प्रलंबित विभागीय
चौकशांची प्रकरणे विहीत मुदतीत
पूर्ण करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.चौकशी-२०२२/प्र.क्र.३३३/फ-१२**
मादाम कामा मार्ग, हूतात्मा चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ एप्रिल, २०२३

**संदर्भ** :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सीडीआर-०९७/१५६/प्र.क्र.१४/९७/अकरा, दिनांक २४ फेब्रुवारी, १९९७
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. प्रविचौ-२००८/प्र.क्र.११/०८/११-अ, दिनांक ७/४/२००८
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.वशिअ-१३१४/प्र.क्र.२३/११, दिनांक १९ ऑगस्ट, २०१४.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.वशिअ-१३१८/प्र.क्र.९७/११, दिनांक २२ जून,२०१८
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. निप्रआ-१११८/प्र.क्र.११/११-अ, दिनांक ९/७/२०१९

**प्रस्तावना** :-

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ८ मध्ये जबर शिक्षा देण्याची तसेच नियम १० मध्ये किरकोळ शिक्षा देण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

२. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती, १९९१ मधील परिच्छेद ३.१९ नुसार विभागीय चौकशी ६ महिन्यात पूर्ण करणे क्रमप्राप्त आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये नियम १० खालील विभागीय चौकशी ही तीन महिन्यात व नियम ८ खालील विभागीय चौकशी जास्तीत जास्त ६ महिन्यात निकाली काढण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

३. मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ९५८/२०१० (प्रेम नाथ बाली विरुध्द रजिस्ट्रार, उच्च न्यायालय, दिल्ली व इतर) या प्रकरणात दिनांक १६/१२/२०१५ रोजी दिलेल्या निर्णयाचे परिच्छेद ३३ मध्ये "Keeping these factors in mind, we are of the considered opinion that every employer (whether state or private) must make sincere endeavor to conclude the departmental inquiry proceedings once initiated against the delinquent employee within a reasonable time by giving priority to such proceedings and as far as possible it should be conclude within six months as an outer limit. Whether it is not possible for the employer to conclude due to certain unavoidable cause arising in the proceedings within the time frame then efforts should be made to conclude within reasonably extended period depending upon the clause and the nature of inquiry but not more than a year." असे नमुद आहे.

४. शिस्तभंगविषयक प्रकरणी करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या विविध शासन निर्णय / परिपत्रके तसेच वरीलप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असूनही असे निदर्शनास येते की, वनविभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांना निलंबित केल्यानंतर ९० दिवसांचे आत दोषारोप पत्र बजावण्यात येत नाही. दोषारोप पत्र बजावल्यानंतरही ६ महिने पेक्षा जास्त कालावधी उलटूनही विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण केल्या जात नाही. तसेच निलंबित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचा निलंबन आढावा ३ महिन्यात घेण्याबाबत संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये सविस्तर सूचना असूनही बरेच अधिकारी / कर्मचारी दिर्घ काळ निलंबित राहत असल्याचे दिसून आले आहेत. तसेच एकाच प्रकारच्या अपहारासाठी क्षेत्रीय कार्यालय व शासन स्तरावर दोन स्वतंत्र विभागीय चौकशी सुरु होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, एखाद्या प्रकरणामध्ये दोन किंवा त्यापेक्षा अधिकारी शासकीय कर्मचारी संबंधित असतील तेव्हा अशा शासकीय कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती, १९९१ मधील नियम ६.११ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनूसार व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम १२ नूसार अपहारातील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून विभागीय सुरु करणे आवश्यक आहे. सबब उक्त बाबी विचारात घेऊन, वन विभागातील प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा येथील शासन निर्णय / परिपत्रकानूसार प्रभावी उपायोजना करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

वनविभागात दिर्घ काळ प्रलंबित राहणा-या विभागीय चौकशीची प्रकरणे विचारात घेऊन पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्याबाबत कळविण्यात येत आहे.

**(अ) दोषारोप पत्र बजावणे :-**

१) निलंबित शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यास निलंबनापासून ९० दिवसांचे आत दोषारोप पत्र बजावण्याची सक्षम प्राधिकाऱ्याने दक्षता घ्यावी.

२) शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यास निलंबित केले नसेल तर प्राथमिक चौकशी पूर्ण झाल्यानंतर किंवा कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने उत्तर प्राप्त झाल्यानंतर उत्तर समाधानकारक नसल्यास १५ दिवसांचे आत दोषारोप पत्र बजावण्याची सक्षम प्राधिकाऱ्याने दक्षता घ्यावी.

**(ब) निलंबित अधिकाऱ्यास पुनःस्थापित करणे :-**

१) निलंबित शासकीय सेवकांच्या ज्या प्रकरणी ३ महिन्यांच्या कालावधीत विभागीय चौकशी सुरु करुन दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे, अशा प्रकरणी निलंबन केल्यापासून ३ महिन्यात निलंबनाचा आढावा घेऊन निलंबन पुढे चालू ठेवावयाचे असल्यास त्याबाबतचा निर्णय सुस्पष्ट आदेशासह (कारण मिमांसेसह) सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्तरावर घेण्यात यावा. याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या तरतूदी विचारात घ्याव्यात.

२) निलंबित शासकीय सेवकांच्या ज्या प्रकरणी ३ महिन्यांच्या कालावधीत विभागीय चौकशी सुरु करुन दोषारोप पत्र बजावण्यात आले नाही, अशा प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश पाहता, निलंबन समाप्त करण्याशिवाय अन्य पर्याय राहत नाही. त्यामुळे निलंबित शासकीय सेवकांबाबत विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करुन दोषारोप पत्र बजावण्याची कार्यवाही निलंबनापासून ९० दिवसांच्या आत काटेकोरपणे केली जाईल याची दक्षता / खबरदारी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्तरावर घेण्यात यावी.

३) फौजदारी प्रकरणात विशेषतः लाचलुचपत प्रकरणी निलंबित शासकीय सेवकांवर विभागीय चौकशी सुरु करुन दोषारोप पत्र बजावणेबाबत आवश्यक तो अभिलेख लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने संबंधीत प्रशासकीय विभागास उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. तसेच या संदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२३/०८/२०१६ च्या तरतूदीनूसार पुढील कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याने करावी.

४) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम १० अंतर्गत चौकशी प्रस्तावित / सुरु असेल तर निलंबनाची कार्यवाही अपेक्षित / समर्थनीय नाही याचीही सक्षम प्राधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. त्यामुळे, जेथे निलंबित शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द नियम १० खाली चौकशी करावयाचा निर्णय होईल अशा प्रकरणी त्या निर्णयासोबतच निलंबन संपुष्टात आणून अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्याबाबतचा उचित निर्णय देखील संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्तरावर घेण्यात यावा. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१४/१०/२०११, दि.३१/१/२०१५ व दि.०९/०७/२०१९ मधील तरतूदींचे अवलोकन व्हावे.

**(क) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ अंतर्गत कार्यवाही** :-

१) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ अंतर्गत दोषारोप पत्र बजावल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत विभागीय चौकशी ६ महिन्यात संपुष्टात आणण्याची दक्षता शिस्तभंग विषयक प्राधिकारी / चौकशी प्राधिकारी यांनी घ्यावी.

२) विभागीय चौकशी विहीत मुदतीत संपुष्टात आणणेकरीता **परिशिष्ट-अ** प्रमाणे कालबध्द कार्यक्रम ठरवून देण्यात येत आहे.

३) काही प्रकरणांमध्ये उचित व पुरेशा कारणासाठी सहा महिन्याच्या विनिर्दिष्ठ काळामध्ये विभागीय चौकशी पूर्ण करणे शक्य नसेल तर मुदतवाढीबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ७ एप्रिल २००८ प्रमाणे कार्यवाही करावी.

४) विभागीय आयुक्त यांचे कार्यालयातील चौकशी अधिका-यांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या विचारात घेऊन प्रकरणी यथाशिघ्र निकालात काढण्याचे दृष्टीने कंत्राटी चौकशी अधिकारी यांचेकडे प्रकरण सोपविण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

५) विभागीय चौकशी सुरु होऊन पाच वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे, अशा प्रकरणी विभागीय चौकशी दीर्घकाळ प्रलंबित राहण्यासाठी कोण जबाबदार आहे याची निश्चिती विभाग प्रमुखांनी करावी तसेच आवश्यकतेनुसार संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

६) विभागीय आयुक्त सर्व यांनी त्यांचे अधिनस्त विभागीय चौकशी अधिकारी यांचेकडील चौकशीचे प्रकरण विहीत मुदतीत निकाली काढले जातील, अशा रितीने नियोजन करावे.

७) सदर शासन निर्णय निर्गमित करण्याचे दिनांकास विभागीय चौकशी प्रकरणे प्रलंबित असतील त्याची कार्यालयनिहाय यादी तयार करावी, आवश्यकतेनूसार परि. क्र. (३) नुसार मुदतवाढ घेण्यात यावी. तसेच सदर प्रलंबित प्रकरणे सोबतचे **परिशिष्ट-अ** मधील कालबध्द कार्यक्रमानुसार निकाली काढण्याची कार्यवाही करावी.

तथापि, विभागीय चौकशी सुरु असतांना अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही अंतिम करताना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ९ नुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे नियम २७ अंतर्गत कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सोबतचे **परिशिष्ट-अ** मधील कालबध्द कार्यक्रम अपवाद ठरु शकेल.

**(ड) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम १० अंतर्गत कार्यवाही** :-

१) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम १० अंतर्गत दोषारोप पत्र बजावल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत विभागीय चौकशी ३ महिन्यात संपुष्टात आणण्याची दक्षता शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांनी घ्यावी.

२) अपचारी यांना दोषारोप पत्र बजावल्यानंतर त्यांना अभिवेदन सादर करण्यासाठी १० दिवसांचा वेळ देण्यात यावा.

३) अपचारी यांचेकडून अभिवेदन प्राप्त झाल्यानंतर शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांनी अभिवेदन विचारात घेऊन १ महिन्याचे आत विभागीय चौकशीअंती अंतिम निर्णय घेण्यात यावा.

**(इ) अपिल प्रकरणे:-**

१) विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती, १९९१ मधील प्रकरण आठ मध्ये व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ भाग पाच “अपिल प्रकरण” समाविष्ट असून विभागीय चौकशी प्रकरणी अंतिम शास्ती आदेशाविरुध्द नियम १८ प्रमाणे अपिलीय प्राधिकारणे घोषित करण्यात आले आहे. अपिलीय प्राधिकरणाची यादी परिशिष्ट “ब” मध्ये दिलेली आहे.

२) अपिल प्राधिकरणाकडून शास्ती आदेशाविरुध्द प्राप्त अपिल प्रकरणी कार्यवाही करुन अंतिम कार्यवाही करण्याची दक्षता सक्षम प्राधिकाऱ्याने घ्यावी.

३) असेही निदर्शनास येते की, मुळ शिक्षेच्या आदेशामध्ये अपिलीय प्राधिकरण कोण आहे व किती कालावधीत अपील करता येते याचा उल्लेख नसतो. तरी शिक्षेच्या आदेशामध्ये अपिलीय प्राधिकरण कोण आहे व त्यांचेकडे किती कालावधीत अपील करता येते याचा स्पष्ट उल्लेख करावा.

२. सदर शासन परिपत्रकातील सुचनांचे पालन वनविभागातील सर्व कार्यालये तसेच विभागीय आयुक्त यांचे कार्यालयातील विभागीय चौकशी अधिकारी तसेच अन्य चौकशी प्राधिकरणाने यांनी करावे. प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरण विहित कालावधीमध्ये निकाली काढण्याची जबाबदारी संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यावर राहिल. तसेच प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणांचा आढावा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सेवाविषयक मासिक आढावा बैठकीमध्ये घेण्यात यावा.

३. सदर शासन परिपत्रक शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यांचा सांकेतांक क्रमांक २०२३०४१८१३३०११६८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

मा. राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

SUNIL PANDURANG PANDHARE

Digitally signed by SUNIL PANDURANG PANDHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7f874792415b92ba519384cacb41b53a89cf93dbd96d4be1f7d97fb6326eed47, pseudonym=E356063E1710100620E953749C8FA6F85E9A154E, serialNumber=8B7DC58E83C9774E4419A7AEEAC77EAE7CDEA272D759DFB29451BCFE7E3F04C9, cn=SUNIL PANDURANG PANDHARE
Date: 2023.04.18 16:45:02 +05'30'

**(सुनिल पांढरे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
५) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग
६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराट्र राज्य, पुणे
९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), म.राज्य, नागपूर
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
११) प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर
१२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३) विभागीय आयुक्त, सर्व
१४) मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक सर्व
१५) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण सर्व
१६) उपवनसंरक्षक सर्व
१७) स्वतंत्र उप वन विभागाचे उपविभागीय वन अधिकारी सर्व
१८) वन विभागातील सर्व संबंधित कार्यासने (फ-४, फ-७, फ-७ अ, फ-८, फ-१२ )
१९) निवडनस्ती फ-१२ कार्यासन.

## परिशिष्ट-अ

## महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ अंतर्गत कार्यवाहीसाठी कालबध्द कार्यक्रम

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | निलंबित केले असल्यास दोषारोप पत्र बजावणे | ९० दिवसांचे आत |
| २ | दोषारोप पत्र बजावल्यानंतर अपचारी यांचेकडून अभिवेदन प्राप्त करुन घेणे | १० दिवस |
| ३ | अपचारी यांनी आरोप कबुल न केल्यास चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणे | १० दिवस |
| ४ | विभागीय चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर करणे | ४ महिने |
| ५ | चौकशी अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावरील निष्कर्षासहीत अपचारी यांना अभिवेदन सादर करण्यास कळविणे | १० दिवस |
| ६ | चौकशी अहवालावर अपचारी यांचे अभिवेदन प्राप्त करुन घेणे | १५ दिवस |
| ७ | चौकशी अहवाल, अपचा-याचे अभिवेदन विचारात घेऊन शिस्तभंग विषयक प्राधिका-याने निर्णय घेणे / जबर शिक्षेचा प्रस्ताव नियुक्ती प्राधिका-यास पाठविणे. | १५ दिवस |

*********

## परिशिष्ट-ब

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ भाग पाच

### “अपिल प्राधिकरण”

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी | अपिल प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | गट-अ व गट-ब चे अधिकारी | (अ) तिला शिक्षा करणा-या व शासनाला दुय्यम असणा-या प्राधिका-याने काढलेल्या आदेशाविरुध्द शासन अपिलीय प्राधिकारी आहे.<br>(आ) ज्या प्रकरणी शिक्षा देण्याचे आदेश शासनाने अथवा शासनास दुय्यम नसणा-या अन्य प्राधिकरणाने काढले असेल अशा आदेशाविरुध्द राज्यपाल अपिलीय प्राधिकारी आहे. |
| २ | गट-क व गट-ड चे कर्मचारी | शिक्षा करणा-या अधिका-याच्या निकटचे वरिष्ठ अधिकारी अपिलीय प्राधिकारी आहेत. |
| ३ | नियम-१२ (सामाईक चौकशी) | ज्या आदेशाविरुध्द करावयाचे अपील हे, त्या कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ शिस्तभंगविषयक प्राधिकारी म्हणून कार्य करणारा अधिकारी ज्या प्राधिकाऱ्याला निकट दुय्यम असेल त्या प्राधिकाऱ्याकडे केले पाहिजे.<br>परंतू, राज्यपाल हे ज्याचे अपिलीय प्राधिकरण आहेत अशा शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत जेव्हा असे प्राधिकरण राज्यपालांना दुय्यम असेल त्यावेळी असे अपील राज्यपालांकडे करण्यात येईल. |

*********